# पोलीस दैनिक गुन्हे वार्तापत्र
# नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
## दिनांक 17/03/2020 (मंगळवार)
## (दुपार)

---

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर रायसोनी कॉलेज चिचोली येथे दिनांक 16/03/2020 चे 22.00 वा. दरम्यान आरोपी नामे –संदिप सदाशिव मानकर, वय 50 वर्ष, रा. चिचोली अंगझडतीत घेतली असता आरोपीने अंगात घातलेले शर्टचे आतील भागात खेचलेली एक लोंखडी तलवार 28 इंच लांब व 1 इंच रूंदी पात्याची किंमत 300 रू याची मिळुन आले.

सदर प्रकरणी सरकार तर्फे पोलिस नाईक नितेश पिपरोदे पोस्टे. खापरखेडा यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 4, 25 भारतीय हत्यार कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीस अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवरलदार बंडु कोकाटे हे करीत आहेत.

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीस अटक

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– फिर्यादी नामे– सुहास रिवाराम कहार, वय 40 वर्ष रा. ग्राम. श्रीवरिया पोस्ट, विलयारी ता. तेंदुखेडा जि. नरसिंगपुर मध्यप्रदेश ह.मु. टाकळघाट ता. हिंगणा जि. नागपुर काशिनाथ कावळे यांचे घरी किरायाने व आरोपी नामे– शेखर कुमार विश्वनाथ सहाणी, वय 27 वर्ष, रा. सेक्टर क्र. 17, रोहणी न्यु, दिल्ली, ह. मु. करमतारा कंपनी एमआयडीसी बोरी ता. जि. नागपूर हे दोघेही करमतारा कंपनी एमआयडीसी बोरी येथे लेबर म्हणुन काम करतात. अंतर्गत 1 कि. मी. अंतरावर करमतारा येथे दि. 17/03/2020 चे 08.00 वा. ते 22.30 वा. दरम्यान फिर्यादी व आरोपी हे दोघेही कंपनीमध्ये काम करण्यासाठी आले. फिर्यादी हा लोंखडी एंगल शिफ्टींगचे काम करीत होता. तेथेच काम करणारा आरोपी शेखर याने फिर्यादीस टोकले की, 'तु अच्छेसे काम कर असे म्हटले असता फिर्यादीने म्हटले की, मी मागिल 6 वर्षापासून हेच काम करित आहे. या कारणावरून त्यांचा शाब्दिक वादविवाद झाला. तेव्हा आरोपीने चिडून लेबर रूममधील चाकू आणला व फिर्यादीच्या पोटावर दोन वेळा वार केले. तसेच आरोपीने फिर्यादीच्या डाव्या हाताचे दंडावर चाकुने वार करून फिर्यादीस गंभीर जख्मी केले. कंपनीतील एच. आर. पांडे यांनी फिर्यादीला उपचाराकरिता नागपुर मेडिकल कॉलेज येथे भरती केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 307 भादवी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. नमुद गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री दिनकर दरोडे हे करीत आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर